**नि.फौ.प्र. कं. ९५३/२०२२**
**शासन—वि—शरद कदम व इतर**
**नि.कं. ४९**

सरकार पक्षातर्फे साक्षीदार कमांक ४ यांची जबानी :—
मी याव्दारे शपथेवर कथन करते की —

| | |
|---|---|
| माझे नांव | :— चंद्रकांत विठोबा जाधव |
| वय | :— ६९ वर्षे, धंदा :— सेवानिवृत्त, |
| रा. | :—चिंचवड, पुणे. |

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी विधीज्ञ**
**श्री. संजय राठोड यांचेतर्फे शपथेवर सुरु**

मी विष्णु गुलाब काशिद यांना मागील ४५ वर्षापासुन ओळखतो. ते आमचे गावकरी आहे. फिर्यादी ही विष्णुची मुलगी आहे व तिचे सन सन २००८ मध्ये शरद कदम सोबत झाले होते व सदरचे लग्नात मी सुध्दा उपस्थित होतो. लग्नाचे दोन ते तीन महिन्यानंतर फिर्यादीचे तिचे सासरचे लोकांसोबत भांडणे झाली होती. ती मिटविण्याकरिता मी स्वतः गेलो होतो. आरोपी लोक हे फिर्यादीचा पैशाचे कारणांवरुन छळ करित होते, ती दिसायला चांगल नाही व ड्रायव्हरची मुलगी आहे असे म्हणुन छळ करित होते.

२. मी फिर्यादीचे पतीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. पी. चव्हाण यांचेतर्फे शपथेवर सुरु**

३. पोलीसांनी माझेकडुन घटनेबद्दल चौकशी केली नव्हती. फिर्यादीचे पतीचे नाव शरद कदम आहे त्याचे पुर्ण नाव मी सांगु शकत नाही. तसेच फिर्यादीचे सासु सास—यांचे, दिर, नणंदेचे पुर्ण नाव मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे फिर्यादीच्य सासु, सासरे, दिर व नणंदेशी कधीच संपर्क आलेला नाही. फिर्यादी व सासरचे लोकांमध्ये नेमके कोणत्या कारणांवरुन वाद झाले होत हे मी आज रोजी सांगु शकत नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की मी फिर्यादीचे लग्नात उपस्थित नव्हतो व फिर्यादीला तिचे सासरचे लोकांनी पैशाचे, दिसण्याचे व वडिल ड्रायव्हर असल्याचे कारणांवरुन कधीच त्रास दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी

आज रोजी फिर्यादीचे सांगणेवरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले —समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.09.20 17:52:41 +0530

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.09.20 17:52:44 +0530

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.
दि.२०.०९.२०२५

**( अल अमुदी ए. के. )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्रीमती किर्ती उदय पवार |
| न्यायालयाचे नांव | : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे. |
| न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक | :२०/०९/२०२५ |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक | :२०/०९/२०२५ |
| पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक | : २०/०९/२०२५ |

स्वाक्षरीत/–

लघुलेखक(श्रेणी–iii)